दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १२७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रु. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## गडचिरोली 'ग्रीन स्टील हब' म्हणून उदयास येणार

**मुंबई :** गडचिरोली जिल्हा निर्मितीला २६ ऑगस्ट रोजी ४४ वर्षे पूर्ण होत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्यातील नागरिकांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देत गडचिरोलीच्या विकासाचा आढावा घेतला. "गडचिरोली आता माओवादमुक्त असून देशाचे 'ग्रीन स्टील हब' म्हणून उदयास येत आहे," असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले. गडचिरोलीचे आपल्या मनात विशेष स्थान असल्याचे सांगत फडणवीस यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

## अहिल्यानगरच्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा मोठा दिलासा

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. कर्जमाफीच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या 36 हजार 424 कर्जदार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे. त्यांच्या खात्यावर एकूण 348 कोटी 51 लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत.

## थोडक्यात वार्ता

### PMFME योजनेत अहिल्यानगर जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावर प्रथम पुरस्कार



**अहिल्यानगर :** प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) योजनेच्या उत्कृष्ट अंमलबजावणीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावर प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले. नवी दिल्ली येथील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे आयोजित राष्ट्रीय PMFME कॉन्क्लेव्हमध्ये केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी पुरस्कार स्वीकारला. PMFME योजनेअंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ८५५ अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात आले आहेत. या उद्योगांना सुमारे ७९ कोटी रुपयांचे अनुदान वितरित झाले असून, लाभार्थ्यांना सरासरी ११.६८ लाख रुपयांचे प्रकल्प कर्ज आणि ४.२७ लाख रुपयांचे अनुदान मिळाले आहे. या योजनेमुळे असंघटित क्षेत्रातील अन्न प्रक्रिया व्यावसायिकांना संघटित क्षेत्रात येण्याची संधी मिळाली असून, बँक कर्ज व विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ झाले आहे. अन्न प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून जिल्ह्यात रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे.

### पहिले लग्न लपवून दुसरे लग्न लावून केली फसवणूक

**सिल्लोड :** पूर्वीचे झालेले लग्न जाणीवपूर्वक लपवून दुसरे लग्न करणे, फसवणूक करून, लग्नासाठी दबाव टाकून धमकावणे, पैशांची मागणी करणे, शारीरिक व मानसिक छळ करून डांबून ठेवणे तसेच सोशल मीडियावर बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी सिल्लोड न्यायालयाच्या आदेशाने सिल्लोड शहर पोलिसांनी मंगळवारी सकाळी ९ वाजता पत्नी तिचा भाऊ व आई अशा तिघांविरुद्ध गुन्हे दाखल केले. सदर घटनेत विलास अश्रुबा नरवाडे (वय ३४, रा. सिल्लोड) यांची फसवणूक झाली असून त्यांनी दिलेल्या तक्रार त्यावरून पोलिसांनी त्यांची पत्नी गुनप्रिया विलास नरवाडे (वय ४०), तिचा भाऊ किरण मोतीराम सोनवणे (वय ५०) आणि तिची आई यमुनाबाई मोतीराम सोनवणे (वय ६६, सर्व रा. आनंद पार्क, सिल्लोड) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. माझी फसवणूक झाली असून वरील लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा याबाबत विलास नरवाडे यांनी सिल्लोड न्यायालयात दावा दाखल केला होता या प्रकरणी मागील आठवड्यात सिल्लोड न्यायालयाने पोलिसांना चौकशी करून या प्रकरणी गुन्हा दाखल करावा असे निर्देश दिले होते त्या अनुषघाणे वरील तिन्ही लोकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

### नेपाळ येथे अडकलेल्या नागरिकांसाठी मदत

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, विविध देशांतील तसेच महाराष्ट्रातील अनेक पर्यटक/नागरिक तेथे अडकले असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर, नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांची माहिती संकलित करून त्यांना तात्काळ आवश्यक ती मदत व सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत उपरोक्त लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी परभणी जिल्ह्यातील नागरिकांनी सदर लिंकवर नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांची उपलब्ध माहिती तात्काळ भरावी व त्याबाबतची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्र, परभणी या कार्यालयासही त्वरित कळवावी.




# फर्दापूरमध्ये मृत्यूचा उघड्यावर खेळ अवैध गॅस भरणाऱ्या चालत्या फिरत्या बॉम्ब मुळे विदेशी पर्यटकांचाही जीव धोक्यात

## एखादा मोठा स्फोट होऊन आंतरराष्ट्रीय बदनामी होण्याची प्रशासन वाट पाहत आहे का



हिंदू प्रकाशवार्ता । शेख हक्कानी

**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांचे प्रवेशद्वार असलेल्या आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फर्दापूरमध्ये सध्या मृत्यूचा उघड्यावर खेळ सुरू आहे फर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांचा सुळसुळाट झाला असून या वाहनांमध्ये अत्यंत धोकादायक पद्धतीने घरगुती गॅस LPG भरला जात आहे प्रवाशांनी खच्चून भरलेल्या या गाड्या म्हणजे जणू चालते फिरते बॉम्ब'च आहेत मात्र चिरीमिरी आणि हप्तेखोरीच्या मोहात अडकलेले फर्दापूर पोलीस या भयंकर प्रकाराकडे जाणीवपूर्वक गांधारीसारखी डोळेझाक करत आहेत

### वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज

**फर्दापूर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांचा हा गलथान आणि भ्रष्ट कारभार पाहता आता थेट पोलीस अधीक्षक SP आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी RTO यांनीच यात लक्ष घालण्याची वेळ आली आहे या अवैध गॅस अड्ड्यांवर तातडीने छापे मारून कठोर कारवाई करावी आणि संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत अशी संतप्त मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे**

बीट जमादार तर फक्त कठपुतळी मुख्य सूत्रधार तर साहेबच

स्थानिक पातळीवर अशा अवैध धंद्यांसाठी अनेकदा फक्त बीट जमादारांना दोष दिला जातो पण वास्तव हे आहे की बीट जमादार हे केवळ सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या हाताखालचे कर्मचारी आहेत 'साहेब जे सांगणार जमादार तेच करणार साहेबांच्या आशीर्वादाशिवाय या हद्दीत एक पानही हलू शकत नाही. जर साहेबांनीच या अवैध गॅस माफियांवर कारवाई न करण्याचे अर्थपूर्ण' आदेश दिले असतील, तर खालचा कर्मचारी कारवाईची हिंमत कशी करणार त्यामुळे या मृत्यूच्या खेळातील हप्त्यांचा वाटा थेट वरपर्यंत पोहोचत असल्याची गावात दबक्या आवाजात चर्चा आहे

विदेशी पर्यटकांचा बळी गेला तर जगात काय संदेश जाणार

फर्दापूर हे काही साधे गाव नाही येथे दररोज देश विदेशातून हजारो पर्यटक अजिंठा लेणी पाहण्यासाठी येतात या बस स्टँड आणि टॅक्सी स्टँड परिसरात देशी विदेशी पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नाकाखालीच हा गॅस भरण्याचा गोरखधंदा राजरोसपणे सुरू आहे यापूर्वी याच ठिकाणी गॅस भरताना दोन वेळा आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत उद्या जर येथे गॅस भरताना मोठा स्फोट झाला आणि त्यात एखाद्या विदेशी किंवा देशी पर्यटकाचा बळी गेला तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची काय बदनामी होईल महाराष्ट्रातील पर्यटन स्थळी पर्यटकांचा जीव वाऱ्यावर आहे असा लाजिरवाणा संदेश जगात गेला तर याला फर्दापूरचे API साहेब जबाबदार राहणार का

प्रशासनाला नागरिकांचे थेट आणि परखड सवाल

'तेरी भी चूप मेरी भी चूप' कधीपर्यंत उघड्यावर एवढ्या भयंकर पद्धतीने गॅस एका सिलिंडरमधून दुसऱ्या टाकीत भरला जात असताना पोलीस कारवाई का करत नाहीत की खिशाला वजन लागल्यामुळे सर्वांनी मौन बाळगले आहे स्फोट झाला तर जबाबदार कोण टॅक्सीमध्ये गॅस भरताना जर आग लागली तर गाडीतील निष्पाप प्रवासी पर्यटक आणि आजूबाजूच्या लोकांच्या जिवाचे जे काही बरे वाईट होईल त्याची जबाबदारी पोलीस घेणार आहेत का मोठ्या दुर्घटनेची वाट पाहताय का जोवर एखादी मोठी जीवितहानी होत नाही किंवा माणसे जळून खाक होत नाहीत, तोवर पोलीस प्रशासन असेच एसी केबिनमध्ये आराम फरमावणार का

# अयोध्येत NSG चे सातवे प्रादेशिक केंद्र सप्टेंबरपासून सुरु होणार



अयोध्या : उत्तर प्रदेशमध्ये अयोध्येत NSG चे (National Security Guard) सातवे प्रादेशिक केंद्र सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. सुरक्षेशी संबंधित कोणत्याही आणीबाणीचा सामना करण्यासाठी तसेच दहशतवादी हल्ला झाल्यास तातडीने कारवाई करण्यासाठी अयोध्येत NSG चे प्रादेशिक केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

दहशतवादी हल्ला झाल्यास तातडीने योग्य ती कारवाई करणे शक्य व्हावे यासाठी निवडक संवेदनशील जिल्ह्यात NSG ची (National Security Guard) प्रादेशिक केंद्र सुरू करण्याचा निर्णय झाला आहे. या योजनेनुसार मुंबई, चेन्नई, कोलकाता, हैदराबाद, अहमदाबाद आणि जम्मू येथे या सहा ठिकाणी NSG ची (National Security Guard) प्रादेशिक केंद्र सुरू करण्यात आली आहेत. आता अयोध्येत NSG चे प्रादेशिक केंद्र सुरू होत आहे. हे NSG चे देशातले सातवे प्रादेशिक केंद्र असेल.

सुरक्षेशी संबंधित कोणत्याही आणीबाणीचा सामना करण्यासाठी तसेच दहशतवादी हल्ला झाल्यास तातडीने कारवाई करण्यासाठी NSG कमांडो प्रशिक्षित असतात. त्यांच्याकडे अशी परिस्थिती हाताळण्यासाठी शस्त्रे, गोळ्या- दारूगोळा, आधुनिक यंत्रणा असते. एनएसजीच्या प्रादेशिक केंद्रामुळे उत्तर प्रदेशच्या पोलीस यंत्रणेला कमांडोंशी समन्वय साधून सुरक्षा यंत्रणा आणखी सक्षम करता येणार आहे. ग्रुप कमांडंट दर्जाच्या अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली एनएसजीचे एक पथक अयोध्या येथील प्रादेशिक केंद्रावर वर्षातील ३६५ दिवस चोवीस तास उपलब्ध असेल.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये गुरुग्रामच्या मानेसर येथे एनएसजीच्या ४१ व्या स्थापना दिनाच्या सोहळ्याला संबोधित करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लवकरच अयोध्येत NSG चे (National Security Guard) प्रादेशिक केंद्र सुरू करण्याची घोषणा केली होती.

ही घोषणा लवकरच प्रत्यक्षात येणार आहे. एनएसजीने १९८४ पासून आतापर्यंत 'ऑपरेशन अश्वमेध', 'ऑपरेशन वज्रशक्ती' आणि 'ऑपरेशन धांगू' यांसारख्या मोहिमांमधून, तसेच अक्षरधाम हल्ला आणि मुंबई दहशतवादी हल्ल्यांदरम्यान शौर्य आणि कार्यक्षमतेने राष्ट्राचे रक्षण केले आहे. एनएसजीच्या जवानांनी देशभरातील ७७० हून अधिक महत्त्वाच्या ठिकाणांची टेहळणी केली असून, संभाव्य दहशतवादी हल्ल्यांना तोंड देण्यासाठी धोरणात्मक योजनांसह एक डेटा बँक तयार केली आहे. याशिवाय, एनएसजीने रुग्णालये, धार्मिक स्थळे, इतर महत्त्वाच्या संस्था, जलमार्ग आणि भारताची संसद यांच्या सुरक्षेचे काळजीपूर्वक नियोजन केले आहे.

एनएसजी हे गृह मंत्रालयाचे नोडल राष्ट्रीय दहशतवादविरोधी दल आहे, जे सर्व प्रकारच्या दहशतवादविरोधी कारवाया हाताळते. एनएसजी हे विशिष्ट परिस्थिती हाताळण्यासाठी विशेषतः सुसज्ज आणि प्रशिक्षित केलेले दल आहे आणि म्हणूनच, गंभीर दहशतवादी कृत्ये हाणून पाडण्यासाठी त्याचा वापर केवळ अपवादात्मक परिस्थितीतच केला जातो.

## राज्यातील 20 लाख विद्यार्थ्यांना मिळणार मोफत चष्मे ; त्रिपक्षीय करार

मुंबई : वाढत्या स्क्रीन टाईममुळे अनेक विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच डोळ्यांच्या समस्या उद्भवू लागल्या आहेत. योग्य वयात याचे निदान झाल्यास, भविष्यातील गंभीर धोके टाळता येतात. ही बाब लक्षात घेऊन महायुती सरकारने विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची मोफत तपासणी करण्याबाबत आणि दृष्टीदोष असलेल्यांना मोफत चष्मे उपलब्ध करून देण्याबाबत बुधवारी त्रिपक्षीय सामंजस्य करार केला. या उपक्रमांतर्गत राज्यातील सुमारे २० लाख विद्यार्थ्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'सह्याद्री' राज्य अतिथीगृह येथे हा महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. शालेय शिक्षण विभाग, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन यांच्यातील करारप्रसंगी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त राजीव मेहता, वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशनचे संचालक वेणू अंबाती यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या करारानुसार, राज्यातील शासकीय शाळांमधील ५ वी ते १० वीच्या तब्बल २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यासाठी एक विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत या संपूर्ण प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल. यामध्ये रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट प्रकल्प अंमलबजावणी भागीदार म्हणून, तर वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन तांत्रिक भागीदार म्हणून आपली भूमिका बजावणार आहे. तसेच तपासणीनंतर दृष्टीदोष आढळलेल्या पात्र विद्यार्थ्यांना विनाशुल्क चष्मे उपलब्ध करून देण्याची मोठी जबाबदारी या संस्थांवर असणार आहे.

## दुचाकी घसरून आणि विजेचा धक्का लागून दोघे जखमी

**कन्नड :** तालुक्यात घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोघे जण जखमी झाल्याची माहिती आहे. सातकुंडजवळ दुचाकी घसरल्याने नारायण मानसिंग चव्हाण (वय ५०) हे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी शुभम राजपूत यांनी त्यांच्यावर प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. दरम्यान, दुसऱ्या घटनेत राहुल मगन जाधव (वय अंदाजे ३२) हे रंगकामाचे काम करत असताना विजेचा धक्का लागून जखमी झाले. त्यांना उपचारासाठी कन्नड शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती पाहता पुढील उपचारासाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे

## बस स्टँडवर महिलेच्या गळ्यातील तीन लाखांचे मंगळसूत्र लंपास; तासाभरात आरोपी जेरबंद

कन्नड :दि.२६ ऑगस्ट - कन्नड बसस्थानकावर बसमध्ये चढत असताना महिलेच्या गळ्यातील सुमारे तीन लाख रुपये किमतीची सोन्याची डोरल्याची पोत हिसकावून पळालेल्या आरोपीला कन्नड शहर पोलिसांनी अवघ्या तासाभरात जेरबंद केले. अविनाश गायकवाड (रा. विवाहमांडवा, ता. पैठण) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणी संजय खुशालचंद पांडे (वय ६१, रा. अंधानेर, ता. कन्नड) यांनी कन्नड शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पांडे यांच्या पत्नी बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील काळे मणी असलेली सुमारे २० ग्रॅम वजनाची सोन्याची पोत तोडून हिसकावून नेली. चोरीस गेलेल्या सोन्याची अंदाजे किंमत तीन लाख रुपये आहे.

घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत संशयिताचा शोध घेतला. अवघ्या तासाभरात आरोपी अविनाश गायकवाड याला ताब्यात घेण्यात आले. सदर कामगिरी उपविभागीय पोलिस अधिकारी आरती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सतीश दिंडे, सहाय्यक फौजदार नासेर पठाण,पोलिस नाईक मोईस बेग,पोलिस अंमलदार सागर सुलाने,विशाल लोंढे यांनी केली

# ईद-ए-मिलादुन्नबी : खुलताबादेत पैरहन मुबारकच्या जियारतीसाठी लाखो भाविक दाखल

## मंगळवारी रात्रीपासून बुधवार मध्यरात्रीपर्यंत पवित्र पोशाखाचे दर्शन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी :** ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त बुधवारी खुलताबाद येथील ऐतिहासिक हजरत ख्वाजा जैनोद्दीन शिराजी दर्गाहमध्ये पवित्र 'पैरहन मुबारक' (पवित्र पोशाख) तसेच हजरत ख्वाजा शेख बुरहानोद्दीन गरीब रह. यांच्या दर्गाहमध्ये 'मुए मुबारक' (पवित्र केस) यांच्या जियारतीसाठी लाखो भाविकांनी गर्दी केली. मंगळवारी रात्रीपासून सुरू झालेले दर्शन बुधवारच्या मध्यरात्रीपर्यंत सुरू होते. खुलताबाद येथील दर्गाहमध्ये काचेच्या पेटीत सुरक्षित जतन करून ठेवण्यात आला आहे. बावीस ख्वाजा दर्गाहमध्ये पैरहन मुबारक, तर बाबा बुरहानोद्दीन यांच्या दर्गाहमध्ये मुए मुबारक जियारतीसाठी ठेवण्यात येते. बुधवारी (२६ ऑगस्ट) ईद-ए-मिलादुन्नबी साजरी होत असल्याने भाविकांची मोठी गर्दी झाली.

# रात्रीपासूनच जियारतीला सुरुवात

भाविकांची प्रचंड गर्दी लक्षात घेता दर्गाह कमिटीने मंगळवारी रात्री ९ वाजेपासूनच जियारतीस सुरुवात करण्याचा निर्णय घेतला. बुधवारच्या मध्यरात्रीपर्यंत सलग जियारत सुरू ठेवण्यात आली.

# भाविकांसाठी विशेष सुविधा

लाखो भाविकांच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सुमारे १.५ किलोमीटरपर्यंत बॅरिकेटिंग केले होते. दर्गाह परिसरात आकर्षक रोषणाई व रंगरंगोटी करण्यात आली होती. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग तयार करण्यात आले होते. तसेच दोन्ही दर्गाहमध्ये भाविकांसाठी महाप्रसादाचे (लंगर) आयोजन करण्यात आले होते याशिवाय अनेकांकडून ठिकठिकाणी पोहे, चहा, बिस्किटे, पाणी, कोल्ड्रिंक आदी सुविधांचीही व्यवस्था करण्यात आली होती.



# जर जरी जर बक्ष उरूसाची सांगता

खुलताबाद येथील हजरत शेख मुन्तजबोद्दीन उर्फ जर जरी जर बक्ष यांचा गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या उरूसाची ईद-ए-मिलादुन्नबीच्या दिवशी सांगता झाली. पवित्र पोशाखाचे दर्शन घेतल्यानंतर भाविकांनी जर जरी जर बक्ष यांच्या दर्गाहमध्येही जियारत केली. उरूसात प्रसाद म्हणून खाजाची मोठ्या प्रमाणावर विक्री झाली, तसेच विविध मनोरंजनाच्या साधनांचा भाविकांनी आनंद घेतला.

# पोलिसांचा चोख बंदोबस्त

लाखो भाविकांची गर्दी लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त तैनात केला होता. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव तसेच प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या नेतृत्वाखाली शहरातील प्रमुख चौक, दर्गाह परिसर आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांच्या नियोजनामुळे उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

# मान्यवरांची उपस्थिती

पवित्र पोशाखाच्या जियारतीसाठी सिल्लोडचे आमदार तथा माजी मंत्री अब्दुल सत्तार, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली. हजरत सय्यद जैनोद्दीन दर्गाह कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सत्तार आणि चव्हाण यांनी सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी दर्गाह कमिटीचे अध्यक्ष शरफोद्दीन रमजानी, माजी नगराध्यक्ष तथा दरगाह कमिटी सदस्य अ‍ॅड. कैसरोद्दीन, सचिव मसियोद्दीन, मुनिबोद्दीन, वाजिद शेख,राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक गजानन पाटील फुलारे, दिलीप बनकर पाटील,नगरसेवक अनिस जागीरदार, कैलास बारगळ, दिलीप बाविस्कर, नगरसेवक आयाज बेग, फैजान बेग, परवेज अहेमद, इकबाल अहेमद यांच्यासह मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता आणि एमपीएससीची डागाळलेली प्रतिमा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक (गट-ब) पदासाठी घेण्यात आलेली संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय आणि या प्रकरणात थेट एमपीएससीच्या अवर सचिवांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांना झालेली अटक ही अत्यंत संतापजनक आणि तितकीच गंभीर बाब आहे. लाखो तरुण-तरुणी आपल्या आयुष्याची मोलाची वर्षे उन्हाचा ताण आणि रात्रीचा जागर करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. मात्र, ज्या संस्थेवर या परीक्षा पारदर्शकपणे घेण्याची मुख्य जबाबदारी आहे, त्याच संस्थेतील अधिकारी जर पेपरविक्री आणि भ्रष्टाचारात लिप्त असतील, तर प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याचे काय, हा कळीचा प्रश्न निर्माण होतो. मार्च २०२६ मध्ये झालेली चाळणी परीक्षा, त्यानंतर जुलैमध्ये पार पडलेल्या मुलाखती आणि अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याची वेळ येणे, हा संपूर्ण व्यवस्थेचा पराभव आहे. मुंबई गुन्हे शाखेने कौटील्य अकादमीच्या संचालकासह एमपीएससीच्या अधिकाऱ्यांना बेड्या ठोकून या रॅकेटचा पर्दाफाश केला असला, तर हा केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित प्रकार आहे की याचा विस्तार इतर परीक्षांपर्यंतही झालेला आहे, याचा सखोल आणि निष्पक्ष तपास होणे गरजेचे आहे. २ सप्टेंबरपर्यंत सुनावण्यात आलेली पोलीस कोठडी या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आर्थिक गैरव्यवहाराचे धागेदोरे समोर आणण्यासाठी महत्त्वाची ठरेल. शासनाने संबंधित उमेदवारांना पुन्हा अर्ज न भरता आणि कोणतेही अतिरिक्त शुल्क न देता फेरपरीक्षा घेण्याचे जाहीर केले असले, तरी यामुळे विद्यार्थ्यांचा वाया गेलेला वेळ, झालेला मानसिक संताप आणि आर्थिक नुकसान भरून निघणारे नाही. MPSC सारख्या स्वायत्त आणि घटनात्मक संस्थेवरील सामान्य जनतेचा आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पूर्णपणे उडाला आहे. हा ढासळलेला विश्वास पुन्हा संपादन करायचा असेल, तर या पेपरफुटीतील दोषींवर केवळ निलंबनाची कारवाई न करता त्यांना सेवेतून बडतर्फ करून कठोर कायदेशीर शिक्षा झाली पाहिजे. भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी परीक्षा प्रणालीत पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा कडक वापर अनिवार्य करण्याची गरज आहे.

## रक्षाबंधनाला बहिण-भावांप्रमाणे; पृथ्वीला सुध्दा वृक्ष लागवडीच्या बंधनाची गरज



रक्षाबंधन हा पवित्र सण बहिण-भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे. भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखीपौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण मानला जातो.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्ये"नारळी पौर्णिमा"या नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले.म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे. यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो.अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी "जान जाये पर वचन न जाये"अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या अतुट बंधन;म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव.कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो आणि नवीन उर्जा प्राप्त होते. यामुळे बहिण -भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण-भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष रहाली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत रहाली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे व बदलत्या हवामानामुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन,भूकंप,सुनामी,ज्वालामुखी चा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत सोबतच आता अलनिनोचा प्रभाव वाढत आहे याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे. बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे. यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी,शेतीचे नुकसान, वित्तीय हानी,समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी, भुकंप,वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे. त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात. परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक-एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल,अलनिनोचा प्रभाव कमी होईल अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक, सण उत्सव,राष्ट्रीय कार्यक्रम,आंतरराष्ट्रीय कार्यक्रम,वाढदिवस अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.सोबतच संपूर्ण प्रशासकीय विभाग,शाळा-महाविद्यालये,सामाजिक संस्था यांनी या पवित्र दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवडीसाठी सरकारने प्रोत्साहीत करून निसर्गाला वाचविले पाहिजे.नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## धागा नात्यांचा, जबाबदारी माणुसकीची



श्रावणातील पौर्णिमा आली की घराघरांत एक वेगळीच लगबग सुरू होते. हातात राखी, कपाळावर कुंकवाचा टिळा, औक्षणाचे ताट, मिठाईचा गोडवा आणि डोळ्यांत भावनांचा ओलावा. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नाही; तो प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि परस्पर जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे. हातावर बांधला जाणारा राखीचा धागा दिसायला छोटा असतो, पण त्यात एका बहिणीची माया आणि भावाच्या संरक्षणाची जबाबदारी गुंफलेली असते. मात्र आज प्रश्न एवढाच आहे, राखी बांधून संरक्षणाचे वचन देणे पुरेसे आहे का? बहिणीच्या हाताला राखी बांधताना तिच्या स्वातंत्र्याचा, सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा विचारही केला पाहिजे. कारण संरक्षण म्हणजे तिच्यावर बंधने लादणे नव्हे, तर तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बळ देणे होय. तिच्या शिक्षणाला पाठबळ देणे, तिच्या स्वप्नांना दिशा देणे आणि तिच्या निर्णयांचा आदर करणे, हेच खरे रक्षाबंधन!

आजच्या काळात मुली उच्च शिक्षण घेत आहेत, अंतराळात झेपावत आहेत, सैन्यात सेवा देत आहेत, प्रशासनात नेतृत्व करत आहेत, उद्योग उभारत आहेत. मग 'तू मुलगी आहेस' म्हणून तिच्या स्वप्नांना कुंपण का? तिच्या कपड्यांवर, मित्रमैत्रिणींवर, करिअरवर, विवाहाच्या निर्णयावर आणि आयुष्याच्या निवडीवर नियंत्रण ठेवणे याला संरक्षण म्हणायचे का? नाही! हे संरक्षणाच्या नावाखाली स्वातंत्र्यावर घातलेले बंधन आहे. रक्षाबंधनाचा खरा अर्थ समाजाने नव्याने समजून घेण्याची गरज आहे. आज अनेक बहिणी घरापासून दूर आहेत. काही शिक्षणासाठी, काही नोकरीसाठी, काही संसारासाठी तर काही आपल्या स्वप्नांच्या शोधात हजारो किलोमीटर दूर गेल्या आहेत. मोबाईलच्या पडद्यावरून आलेली 'हॅपी रक्षाबंधन'ची शुभेच्छा, ऑनलाइन पाठवलेली राखी आणि डिजिटल पेमेंटमधून आलेली ओवाळणीची रक्कम, या सगळ्यामुळे अंतर कमी झाले आहे, पण भावनिक जवळीक टिकवण्याची जबाबदारी अजूनही आपलीच आहे. कधी काळी भाऊ बहिणीच्या रक्षणाची शपथ घेत असे. आज काळ बदलला आहे. आता बहीणही भावाच्या आयुष्याची ताकद आहे आणि भाऊही बहिणीच्या स्वप्नांचा साथीदार आहे. त्यामुळे हे नाते एकतर्फी संरक्षणाचे नसून परस्पर आधाराचे झाले पाहिजे.

राखीचा धागा जात, धर्म, भाषा, श्रीमंती-गरिबी यापलीकडे जाणारा आहे. इतिहासातही राखीने माणुसकीचे बंध जोडले आहेत. म्हणूनच आज रक्षाबंधनाच्या निमित्ताने समाजाने एका व्यापक प्रश्नाकडे पाहिले पाहिजे, आपण आपल्या बहिणीचे रक्षण करतो, पण शेजारच्या मुलीच्या सन्मानाचे काय? आपल्या घरातील स्त्रीला सुरक्षित ठेवतो, पण सार्वजनिक ठिकाणी एखाद्या महिलेशी गैरवर्तन होताना आपण गप्प का बसतो? राखी जर मनगटावर बांधली आणि माणुसकी मात्र मनात बांधली नाही, तर त्या राखीचा अर्थ अपुरा आहे. स्त्रीसुरक्षेची जबाबदारी केवळ भावाची नाही. ती कुटुंबाची, समाजाची आणि शासनाचीही आहे. मुलींना 'सावध राहा' असे सांगण्यापेक्षा मुलांना 'स्त्रीचा सन्मान करा' असे शिकवण्याची वेळ आली आहे. मुलीला रात्री बाहेर जाऊ नकोस म्हणण्यापेक्षा रस्ते, सार्वजनिक वाहतूक आणि परिसर सुरक्षित करण्याची जबाबदारी व्यवस्था स्वीकारणार कधी? रक्षाबंधन आपल्याला हाच कठोर प्रश्न विचारते.

आज राखीच्या निमित्ताने प्रत्येक भावाने आपल्या बहिणीला एक वचन द्यावे, तुझ्या स्वप्नांना माझ्या संरक्षणाची नव्हे, माझ्या पाठिंब्याची गरज आहे. तू डॉक्टर होऊ इच्छित असशील तर हो, अधिकारी बनू इच्छित असशील तर बन, व्यवसाय करायचा असेल तर कर, कला-साहित्य क्षेत्रात जायचे असेल तर जा. तुझ्या वाटेतील अडथळा होण्याऐवजी मी तुझ्या पंखांना बळ देईन आणि प्रत्येक बहिणीनेही भावाला एवढेच सांगावे. तुझ्या आयुष्यातील प्रत्येक संघर्षात मी तुझ्या सोबत आहे. कारण भाऊ-बहीण हे केवळ रक्ताचे नाते नसते, ते आयुष्यभराच्या आठवणींचे, भांडणांचे, लाडांचे, काळजीचे आणि निःस्वार्थ प्रेमाचे नाते असते. बालपणीच्या छोट्या छोट्या भांडणांपासून ते मोठेपणीच्या जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते सतत बदलत जाते. कधी बहीण आईसारखी काळजी घेते, कधी भाऊ वडिलांसारखा आधार देतो. पण दोघांमध्ये एक गोष्ट कायम असते 'काहीही झाले तरी तू एकटा/एकटी नाहीस' हा विश्वास. म्हणूनच रक्षाबंधन हा फक्त राखी, मिठाई आणि भेटवस्तूंचा उत्सव होऊ नये. तो नात्यांची उजळणी करणारा आणि माणुसकीची बांधिलकी मजबूत करणारा दिवस व्हावा.

आज आपण प्रत्येक स्त्रीच्या सन्मानाची राखी बांधू या. प्रत्येक मुलीच्या शिक्षणाची राखी बांधू या. तिच्या स्वप्नांच्या स्वातंत्र्याची राखी बांधू या. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची राखी बांधू या आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, माणुसकीच्या मनगटावर माणुसकीचीच राखी बांधू या. कारण राखीचा धागा तुटला तर पुन्हा बांधता येतो, पण विश्वासाचा धागा तुटला तर नाते आयुष्यभरासाठी जखमी होते. या रक्षाबंधनाला केवळ बहिणीच्या मनगटावर राखी नको, तिच्या डोळ्यांतील स्वप्नांना सुरक्षित आकाश हवे. तिच्या पावलांना बंधने नकोत, उंच भरारी घेण्याची मोकळीक हवी. आणि भावाच्या प्रेमाला केवळ शब्द नकोत, आयुष्यभराची साथ हवी. रक्षाबंधन म्हणजे एका धाग्याचे नव्हे, तर आयुष्यभर जपलेल्या विश्वासाचे पर्व आहे. सर्व भाऊ-बहिणींना प्रेम, विश्वास, स्नेह आणि अखंड नात्याच्या या पवित्र पर्वाच्या मनःपूर्वक, हृदयस्पर्शी रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**प्रवीण बागडे, नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

## चौका येथील सिद्धार्थ आश्रमशाळेतील पाच विद्यार्थिनींची प्रकृती बिघडली




**फुलंब्री,दि.२६ ऑगस्ट ,प्रतिनिधी :** फुलंब्री तालुक्यातील चौका येथील सिद्धार्थ आश्रमशाळेतील पाच विद्यार्थिनींची दि.२५ मंगळवार रोजी अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक अंदाजानुसार यातील तीन मुलींना फूड पॉयझनिंग (विषबाधा) झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

दीपाली किशोर सोनवणे (वय १०), आरोही संदीप काळे (वय १३) आणि राधा अनिल माळी (वय १६) या विद्यार्थिनींना मंगळवारी अचानक तीव्र ताप येऊन अस्वस्थ वाटू लागले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शिक्षक संजय कुलकर्णी यांनी त्यांना तत्काळ चौका प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. तेथील प्राथमिक उपचारानंतर रुग्णवाहिकेद्वारे मुलींना फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. याच दरम्यान, आश्रमशाळेतील आरती जाधव आणि रोहिणी मोटे या आणखी दोन विद्यार्थिनींमध्ये तापाची लक्षणे दिसून आल्याने त्यांनाही तातडीने रुग्णालयात भरती करण्यात आले.फुलंब्री ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मणियार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अर्चना उंबरकर, शैलजा कुलकर्णी व नाजमीन शहा यांचे पथक पाचही विद्यार्थिनींवर उपचार करत आहे. मुलींच्या प्रकृतीवर सातत्याने बारीक लक्ष ठेवले जात आहे.

विद्यार्थिनींची प्रकृती नेमकी कशामुळे बिघडली, याचे अचूक कारण वैद्यकीय तपासणीचा सविस्तर अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होईल, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे आश्रमशाळा परिसरात आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात उद्या 'शेतकरी दिन' कृषी विभागाकडून विविध कार्यक्रमांचे नियोजन

**राहाता (प्रतिनिधी):** सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या स्मरणार्थ उद्या, दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यभरात 'शेतकरी दिन' साजरा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या संदर्भात कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध उपयुक्त व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे नियोजन करण्याच्या सूचना कृषी आयुक्तालय व मंत्रालयीन स्तरावरून देण्यात आल्या आहेत. दरवर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी राज्य सरकारकडून त्यांचा जयंती दिन हा 'शेतकरी दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या दिवशी राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शनपर शिबिरे आणि आधुनिक तंत्रज्ञान विषयक कार्यक्रम आयोजित केले जातात. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी तळागाळातील शेतकऱ्यांना एकत्र आणून, त्यांच्या हक्कासाठी देशातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याची म्हणजेच सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

## महिला आर्थिक सक्षमीकरणास प्राधान्य;'उमेद'मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### कृषी अवजार बँक, कृषी निविष्ठा केंद्रांसह महिलांच्या हातात शेतीची यंत्रे

**हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी**

परभणी : ग्रामीण महिलांना केवळ बचत गटांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना शेती, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रभावी प्रयत्न राज्य शासन विविध माध्यमातून करत आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात 'उमेद'च्या माध्यमातून सक्षणीकरणाचे हे काम ग्रामीण भागात यशस्वीपणे व्यापक स्वरुपात सुरू आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, कृषी निविष्ठांची उपलब्धता आणि विविध व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना शाश्वत उत्पन्नाचे साधन मिळत असून, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला नवी दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

'उमेद' अभियानांतर्गत कृषी अवजार बँक आणि कृषी निविष्ठा केंद्र हे दोन महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांना महागडी कृषी यंत्रे स्वतः खरेदी न करता भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, हा कृषी अवजार बँकेचा प्रमुख उद्देश आहे.

४०८ कृषी अवजार बँकांची उभारणी

वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ३५१ तालुक्यांत ४०८ कृषी अवजार बँका स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचा सुमारे ४० हजार ८०० महिला शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. या अवजार बँकांमध्ये विविध कृषिपूरक अवजारांसह ट्रॅक्टरचीही सुविधा उपलब्ध आहे. महिला स्वयंसहाय्यता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून या अवजार बँकांचे व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे या सुविधा केवळ यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या केंद्रांपुरत्या मर्यादित न राहता समुदायाच्या मालकीच्या आणि व्यवस्थापनाखालील कृषी सेवा केंद्रे म्हणून विकसित होत आहेत.

शेतीचा खर्च कमी; उत्पादकतेला हातभार

महागडी कृषी यंत्रे खरेदी करण्याची गरज नसल्याने महिला शेतकऱ्यांचा भांडवली खर्च कमी होत आहे. पेरणी, आंतरमशागत आणि कापणीसारखी कामे आधुनिक यंत्रांच्या साहाय्याने वेळेत पूर्ण होत असल्याने शेतीतील कार्यक्षमता वाढण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर अवजारे भाड्याने देण्याच्या माध्यमातून समुदाय आधारित संस्थांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळत आहे. अवजार बँकांच्या व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतुकीमुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत. त्यामुळे एका उपक्रमातून महिला शेतकरी, बचत गट आणि स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्था अशा अनेक घटकांना लाभ मिळत आहे.

५४ महिला उत्पादक कंपन्यांकडून कृषी निविष्ठांचा पुरवठा

कृषी निविष्ठांच्या क्षेत्रातही 'उमेद'च्या माध्यमातून महिलांना नवी संधी उपलब्ध झाली आहे. राज्यातील ५४ महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे बियाणे व खत विक्रीसाठी आवश्यक परवाने उपलब्ध आहेत. या माध्यमातून सुमारे ५४ हजार महिला सभासदांना सेवा दिली जात आहे.

महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आपल्या सभासदांची मागणी एकत्रित करून मोठ्या प्रमाणावर बियाणे, खते आणि इतर कृषी निविष्ठांची खरेदी करतात. सामूहिक खरेदीमुळे दर्जेदार निविष्ठा वेळेत आणि योग्य दरात उपलब्ध करून देण्यास मदत होत आहे. परिणामी शेतकऱ्यांचा निविष्ठांवरील खर्च आणि बाजारपेठेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेनेही या उपक्रमाची वाटचाल सुरू आहे.

रेशन दुकानापासून वीट निर्मितीपर्यंत

'उमेद' अभियानाने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला कृषी क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता विविध व्यवसायांपर्यंत विस्तार दिला आहे. राज्यात स्वयं-सहाय्यता समूहांच्या माध्यमातून रेशन दुकाने, सिमेंट एजन्सी, वीट निर्मिती, केरोसीन एजन्सी आणि टाईल्स निर्मिती यांसारखे व्यवसायही महिलांकडून चालविले जात आहेत.

३२ स्वयं-सहाय्यता समूहांमधील ५८ महिला रेशन दुकाने, तर एका स्वयं-सहाय्यता समूहातील २३ महिला सिमेंट विक्रीचा व्यवसाय सांभाळत आहेत. दोन समूहांमधील २४ महिला वीट निर्मिती व्यवसायात कार्यरत आहेत. याशिवाय दोन महिला केरोसीन एजन्सी, तर दोन महिला टाईल्स निर्मितीचा व्यवसाय चालवत आहेत.

बचत गटातून उद्योजकतेकडे

'उमेद'च्या माध्यमातून ग्रामीण महिलांचा प्रवास बचत आणि कर्जाच्या चौकटीपलीकडे जाऊन उद्योजकतेकडे होत आहे. व्यवसाय व्यवस्थापन, वित्तीय समावेशन आणि बाजारपेठेशी जोडणी यासाठी संस्थात्मक पाठबळ मिळत असल्याने महिलांची निर्णयक्षमता आणि आर्थिक स्वावलंबन वाढत आहे. ग्रामीण भागातच रोजगार आणि नियमित उत्पन्नाच्या संधी उपलब्ध झाल्याने महिलांच्या कौटुंबिक उत्पन्नाला हातभार लागत आहे. त्याचवेळी गावातील नागरिकांनाही आवश्यक वस्तू आणि सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होत आहेत.महिला स्वयंसहाय्यता समूहांची सामूहिक ताकद, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि उद्योजकतेला संस्थात्मक पाठबळ यांचा संगम घडवून 'उमेद' अभियान ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच गावच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी देत आहे. शेतीतील यांत्रिकीकरणापासून व्यवसायाच्या व्यवस्थापनापर्यंत महिलांचा वाढता सहभाग हा ग्रामीण महाराष्ट्राच्या बदलत्या आर्थिक चित्राचा महत्त्वपूर्ण भाग ठरत आहे.

# परभणीतील वाहतूक व्यवस्था ऐन सणासुदीच्या काळात कोलमंडली असून शहर वाहतूक शाखेचे याकडे दुर्लक्ष

## रस्त्यावरील हातगाडे वाल्याला अभय कोणाचे?; कुणाच्या आशीर्वादाने मुख्य रस्ते व अंतर्गत बाजारपेठेमध्ये अतिक्रमणे वाढली

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

**परभणी:-** अनेक दिवसापासून परभणी शहरामध्ये वाहतूक व्यवस्था कोलमंडली असून वाहतूक व्यवस्थेचा पुरता फज्जा उडाला आहे शहरातील मुख्य रस्ते हे वाहतुकीसाठी आहेत ती वाहनांसाठी आहेत का विक्री करणाऱ्या हातगाडे फळ विक्रेते भाजी विक्रेते यांच्यासाठी आहेत असा संतप्त सवाल परभणीकरांकडून उपस्थित केला जात आहे परभणी शहरदुकानदाराच्या जाहिरातीच्या फलकाने दुकान सोडून दुकानाच्या बाहेर मांडलेले साहित्य आणि रस्त्यावरची बेसिस्त पार्किंग यामुळे शहरातील प्रमुख रस्त्याचे रूपांतर अक्षरशा अरुंद गल्लीबोळात झाले आहे शहरातून वाहतूक करत असताना परभणीकरांचा श्वास कोंडला जात असताना वाहतूक शाखा मात्र वाहनाच्या चालन फाडण्यातच दंग असून केवळ वसुली करणे हाच वाहतूक शाखेची ड्युटी झाली आहे. ही वाहतूक कोंडी आता परभणी करांसाठी नवखी गोष्ट राहील नाही घराच्या बाहेर पडल्यानंतर आपला जीव मूठीत घेऊन प्रवास करावा लागत असतो सकाळ असो का संध्याकाळ असो प्रमुख बाजारपेठेत कुठेही जा मग तो शिवाजी चौक असो किंवा क्रांती चौक असो सुभाष रोड असो किंवा गांधी पार्क असो उड्डाणपूल असो बस स्टँड असो स्टेशन असो वसमत रोड असो किंवा जिंतूर रोड असो सगळीकडूनच वाहतुकीची कोंडी झाली असून वाहनाच्या रांगा लागलेल्या दिसून येत आहेत बस स्टँड पासून रेल्वे स्टेशन पर्यंत त्यांच्या हातून अनेक वेळा गाडी गेल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे अनेक वाहनांना व वाहनचालकांचा मोठा वेळ वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागले असल्यामुळे व शहराच्या अनेक भागात रस्त्याच्या कडेला भाजीपाला फळ विक्री वाल्यांचा सुळसुळाट चालू असून



त्यांच्यासमोर रस्त्याच्या कडेला ग्राहकाची वाहन उभे राहत असून त्यात रस्त्यावर वाहतूक सुरू असते परिणामी या रस्त्याची उपलब्ध जागा दिवसेंदिवस कमी होत चालली असलेले आहे त्यातच दुकानासमोर मोठे मोठे जाहिरात फलक व साहित्याची वाहतुकीच्या अडथळ्यात भर घालत असून छत्रपती शिवाजी महाराज चौक आपणा कॉर्नर गांधी पार्क गुजरी बाजार अष्टपुजा देवी मंदिर चौक आर आर टावर आधी बाजारपेठेत पार्किंगची पुरुष व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांनाही नाईलाजाने रस्त्यावर वाहने उभी करावी लागत तसेच वसमत रोडवरील खानापूर फाटा काळी कमान शिवशक्ती बिल्डिंग शिवाजी कॉम्प्लेक्स राजगोपालचारी उद्यान या मोठ्या प्रमाणात अतिक्रमणाचा विळख्यात अडकली असून मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढले आहेत या अतिक्रमणामुळे मोठा असलेला महामार्ग अरुंद असा झाला असून वाहतूक शाखेचे पोलीस फक्त सायंकाळी गस्त करून रहदारीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनावर ऑनलाईन फाईल मारून मोकळे होतात परंतु या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याऐवजी मनपा प्रशासन वाहतूक शाखेचे परिस्थितीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप परभणीकरांकडून केला जात आहे नवीन पोलीस अधीक्षकाकडून परभणीकरांनी खूप मोठ्या अपेक्षा ठेवल्या होत्या परंतु सणासुदीच्या काळात वाहतूक व्यवस्था कोण म्हणल्यामुळे परभणी करांचा त्रास वाढला असून घराचा बाहेर पडल्यानंतर सुरक्षित परत येईल की नाही याची कसलीच गॅरंटी देता येणार नाही यामध्येच रक्षाबंधन गणेशोत्सव महालक्ष्मी पूजा गौरी महोत्सव नवदुर्गा महोत्सव यासारख्या सणांमध्ये बाजारपेठेमध्ये खरेदीसाठी होणारी गर्दी व गणेश मंडळाच्या होणाऱ्या हालचाली मिरवणुका आणि वाढत्या वाहन संख्या यामुळे सध्याची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमंडल्याची शक्यता आहे आजच मुख्य रस्त्याची ही अवस्था असेल तर सणासुदीच्या काळात कशी अवस्था होईल एखादी आपत्कालीन घटना घडली किंवा रुग्णवाहिका किंवा अग्निशामक दलाचे वाहन कुंडीत अडकले तर याची जबाबदारी कोण घेणार? प्रशासनाला या प्रश्नावर उत्तर द्यावेच लागेल परभणी शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अनेक उपाय योजना आखल्या जात आहेत परंतु त्या निष्फळ ठरत आहेत वाहतूक शाखा सध्या मनुष्यबळ अतिक्रम हटवा म्हणून व्यस्त आहे.

# राष्ट्रीय थाईबॉक्सिंग स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलला तीन सुवर्णपदक




बीड (प्रतिनिधी) : नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या १७ व्या राष्ट्रीय थाईबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीडच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी केली आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत शाळेच्या खेळाडूंनी तब्बल तीन सुवर्णपदके पटकावत शाळेच्या व बीड जिल्ह्याच्या क्रीडा वैभवात मोलाची भर घातली आहे. दिनांक २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान पार पडलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत अनेक नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये तुलसी इंग्लिश स्कूलचे खेळाडू राजवर्धन चव्हाण, आकाश जाधव आणि हर्षद शिरसाट यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत आपापल्या गटात सुवर्णपदकांवर नाव कोरले. राज्यस्तरीय स्पर्धेनंतर राष्ट्रीय स्तरावरही या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या अभूतपूर्व यशामुळे तुलसी शिक्षण समूहाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक मोसिम शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीवर आनंद व्यक्त करत संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे आणि प्राचार्या उमा जगतकर यांनी खेळाडूंचे कौतुक केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनीही गुणवंत खेळाडूंचे मनापासून कौतुक केले आहे.

# बोधेगावात बिबट्याने पाडला हरणाचा फडशा; नागरिक भयभीत

फुलंब्री, दि. २६ ऑगस्ट : फुलंब्री तालुक्यातील बोधेगाव बु.येथील जमधरी परिसरातील आबेद पठाण यांच्या शेतातील गट नं. ३२८ मध्ये शनिवारी (दि. २२) रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास बिबट्याने एका हरणाची शिकार करून फडशा पाडल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतातील झाडाझुडपांमध्ये हरणाचा मृतदेह आढळून आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. हरणाच्या शरीरावर गंभीर जखमा असल्याने बिबट्यानेच त्याची शिकार केली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. जमधरी परिसरात बिबट्याचा वावर असल्याची चर्चा यापूर्वीही नागरिकांमध्ये होती. आता प्रत्यक्ष हरणाची शिकार झाल्याने शेतकरी वर्गात अधिकच दहशत निर्माण झाली आहे. वनविभागाने या परिसरात तातडीने पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

(फुलंब्री तालुक्यातील बोधेगावात बिबट्याने अशा प्रकारे हरणाचा फडशा पाडल्याने नागरिक भयभीत झाले आहे.)

# शाडू मातीपासून विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

## दहा उत्कृष्ट मूर्तींना प्रत्येकी एक हजारांचे पारितोषिक



अहिल्यानगर : अहिल्यानगर महानगरपालिका व रेसिडेन्सी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी विविध रूपांतील गणेशमूर्ती साकारून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला. शिक्षकांनीही कार्यशाळेत सहभाग घेतला. महापौर ज्योतीताई गाडे यांनी विद्यार्थ्यांनी नवीन मूर्ती विकत न घेता स्वतःच्या हाताने तयार केलेल्या शाडू मातीच्या गणेशमूर्तीची घरी स्थापना करावी, असे आवाहन केले. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जल व पर्यावरण प्रदूषण टाळण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आयुक्त यशवंत डांगे यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उत्कृष्ट मूर्तींपैकी दहा मूर्तींची निवड करून संबंधित विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य विजय जाधव, उपप्राचार्य भाऊसाहेब पवार, पर्यावरणप्रेमी सुरेश खामकर, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, मूर्तिकार बालाजी बल्लाळ यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव व पारंपरिक गणेशमिरवणुकीबाबत जनजागृतीपर कला सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय म्हस्के यांनी केले, तर आभार वैशाली मरकड यांनी मानले.

# 'आई कोणाची आजारी होती?' पुस्तकाचे प्रकाशन; डॉ. विक्रम मरवाह यांच्या वैद्यकीय वारशाच्या आठवणींना उजाळा; तीन शिष्यांच्या पुढाकारातून मराठी अनुवाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ पद्मश्री डॉ. विक्रम मरवाह यांच्या 'माँ किसकी बीमार थी?' या प्रसिद्ध हिंदी पुस्तकाचा 'आई कोणाची आजारी होती?' हा मराठी अनुवाद मंगळवारी आयएमए हॉल येथे घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सोहळ्यात प्रकाशित करण्यात आला. अनुवादिका डॉ. माया महाजन यांनी शुभांगी इंटरप्रायझेसच्या माध्यमातून हे पुस्तक मराठीत आणले आहे.

डॉ. विक्रम मरवाह यांनी नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता म्हणून काम केले होते. तसेच १९५६च्या काळात छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अस्थिरोग विभागाचे विभागप्रमुख म्हणूनही त्यांनी सेवा बजावली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या डॉ. भवान महाजन, डॉ. पुरुषोत्तम दरक आणि नांदेडचे डॉ. सुरेश खुरसाळे यांनी आपल्या गुरूच्या आठवणी पुढील पिढीपर्यंत पोहोचाव्यात, या भावनेतून त्यांच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्यासाठी पुढाकार घेतला.

या वेळी बोलताना डॉ. भवान महाजन यांनी डॉ. मरवाह यांच्यासह त्या काळातील ज्येष्ठ




डॉक्टरांनी केवळ प्राध्यापक म्हणून शिकविले नाही, तर त्यांच्या आचार-विचारांतूनही विद्यार्थ्यांना घडविले, असे सांगितले. रुग्णांशी कसे बोलावे, त्यांच्याशी कसे वागावे, याचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून घालून दिला.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी डॉ. मरवाह यांच्यासह त्या काळातील डॉक्टरांनी उभारलेला वैद्यकीय वारसा आजच्या पिढीच्या भवितव्याचा मूलभूत पाया असल्याचे नमूद केले. डॉ. माया महाजन यांनी पुस्तकाच्या अनुवादाचा अनुभव सांगताना डॉ. मरवाह यांच्या व्यक्तिमत्त्वाने आपण भारावून गेल्याचे सांगितले.

डॉ. अजित भागवत यांनी डॉ. मरवाह यांच्यासोबतच्या प्रदीर्घ सहवासातील आठवणींना उजाळा देताना त्यांच्या मिश्कील विनोदबुद्धीचा एक किस्सा सांगितला. डॉ. मरवाह यांच्या विवाहावेळी पत्नीच्या माहेरचे नातेवाईक भावुक झाले होते. त्यावेळी वातावरण हलके करण्यासाठी त्यांनी मिश्कीलपणे, 'माझ्यामुळे तुम्हाला एवढा त्रास होत असेल, तर तुम्ही यांना ठेवून घ्या,' असे म्हणताच वातावरणातील तणाव क्षणात निवळला, अशी आठवण त्यांनी सांगितली.

कार्यक्रमास माजी खासदार उत्तमसिंग पवार, उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सुनील देशमुख, डॉ. विजय बोरगावकर, डॉ. भवान महाजन, डॉ. सुरेश खुरसाळे, डॉ. छाया महाजन, डॉ. विष्णू कदम, डॉ. अमित महाजन, आयएमएचे सचिव डॉ. प्रशांत दरक यांच्यासह वैद्यकीय, साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ. अजित भागवत, डॉ. पुरुषोत्तम दरक, डॉ. राघवेंद्र जोशी, डॉ. श्रीरंग देशपांडे, डॉ. जैस्वाल, प्रकाशक डॉ. चंद्रकांत रागीट आदींचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उर्मिला चाकूरकर यांनी केले.

# चारित्र्याच्या संशयावरून पतीनेच केला पत्नीचा गळा आवळून खून

पैठण: (ढाकेफळ) – संशयाचं भूत माणसाच्या मानगुटीवर बसलं की तो कोणत्या थराला जाईल, याचा काही नेम नसतो. बिडकीनच्या डीएमआयसी (DMIC) परिसरात अशीच एक हादरवून टाकणारी घटना उघडकीस आली आहे.

चारित्र्यावर संशय घेत पतीने स्वतःच्या पत्नीचाच गळा आवळून निर्घृण खून केलाय. सोनाली बोरुडे असं या मृत महिलेचं नाव आहे. या धक्कादायक प्रकारामुळे संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

पत्नीचा गळा आवळून खून, बिडकीन पोलिसांत गुन्हा दाखल

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अनिल प्रल्हाद बोरुडे (वय ४०, रा. दरेगाव, ता. पैठण) याला पत्नी सोनालीच्या चारित्र्यावर संशय होता. याच रागातून २४ ऑगस्टला दुपारी एक वाजेच्या पूर्वी त्याने डीएमआयसी परिसरातील एका शेतात सोनालीचा गळा आवळला आणि तिची हत्या केली.

पत्नीचा निर्घृण खून केल्यानंतर आरोपी अनिल बोरुडे याने घटनास्थळावरून पोबारा केला आहे. तो सध्या फरार असून, पोलीस त्याच्या मागावर आहेत. तो हाती लागल्यानंतरच या हत्येमागचे आणखी काही धागेदोरे उलगडण्याची शक्यता आहे. मुलीच्या मृत्यूची बातमी ऐकून तिची आई पद्मा बनकर (रा. शनि शिंगणापूर) यांना मोठा मानसिक धक्का बसला. त्यामुळे पोलिसांत तक्रार द्यायला उशीर झाला. पण अखेर आईने सावरत रात्री बिडकीन पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी या प्रकरणी तातडीने भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १०३ (१) नुसार खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके या प्रकरणाचा (Murder Case) अधिक तपास करत आहेत. याबाबत अधिक माहिती हाती आल्यावर बातमी अपडेट केली जाईल.

# तुलसी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 68 वा वर्धापन दिन उत्साहात



बीड (प्रतिनिधी) : देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन रविवार, २३ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. निकाळजे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. प्रमुख उपस्थिती म्हणून गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर (का.)चे डॉ. धम्मपाल घुंबरे आणि नवगण महाविद्यालय, परळीचे डॉ. बाळासाहेब कटारे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले व विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. धम्मपाल घुंबरे यांनी, मराठवाड्यात स्वतंत्र विद्यापीठ असावे, ही बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा होती, असे सांगत त्यांनी विद्यापीठाच्या स्थापनेपासून नामांतरापर्यंतचा इतिहास उलगडला. १९५८ मध्ये स्थापन झालेल्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे, यासाठी १९७८ पासून संघर्ष सुरू झाला आणि अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी नामांतराचा ऐतिहासिक निर्णय झाला. या विद्यापीठातून शिक्षण घेऊन देशाच्या विविध क्षेत्रांत कर्तृत्व गाजविणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभिमान असल्याचेही त्यांनी नमूद केले. डॉ. बाळासाहेब कटारे यांनी विद्यापीठाच्या विकासासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले. विद्यापीठाची शैक्षणिक उंची अधिक वाढावी आणि त्याचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी आपण कटिबद्ध राहून कार्य करूया, असा आशावाद व्यक्त करत त्यांनी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डी. जी. निकाळजे यांनी विद्यापीठ वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देत विद्यापीठाच्या ज्ञानपरंपरेत विद्यार्थ्यांनी आपले योगदान देण्याचे आवाहन केले.

# नंदुरबार जिल्ह्यातील सारंगखेडा ते सावळदबारा पायी दिंडी,भाविक भक्तांचे स्वागत भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी केले

सावळदबारा प्रतिनिधी : सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामी मंदिर आहे. नंदुरबार जिल्ह्यातील सारंगखेडा येथून भाविक भक्त पायी दिंडी पालखी श्री चक्रधर स्वामी मंदिर येथे आले

सारंगखेडा, ता. शहादा, जि. नंदुरबार येथील भाविक भक्त दिंडी पालखी घेऊन सावळदबारा येथे आले. पालखीचे सावळदबारा येथे आगमन झाल्यानंतर भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी स्वागत करून पालखीचे दर्शन



घेतले. भाविक भक्तांचे स्वागत केले.

पालखी गावात आल्यानंतर गावातील भाविक भक्तांनी पालखीचे दर्शन घेतले. यावेळी गावातील नागरिकांनी व भाविक भक्तांनी पालखीचे उत्साहात स्वागत केले. दिडी पालखीच्या आगमनामुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले होते.

सावळदबारा येथे पालखी गावात आल्यानंतर घरासमोर रांगोळ्या काढून पालखीचे स्वागत केले. पालखी श्री चक्रधर स्वामी मंदिरात पोहोचल्यानंतर भाविक भक्तांनी श्री चक्रधर स्वामींचे दर्शन घेतले.

सावळदबारा येथील श्री चक्रधर स्वामी मंदिरात दर्शन घेतल्यानंतर दिंडी भाविक भक्त पायी चालत श्री क्षेत्र जाळीचादेव येथे गेले. पायी दिंडी पालखीमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक भक्त होते.

फोटोमध्ये : सावळदबारा ता. सोयगाव येथे पालखीचे सावळदबारा येथे आगमन झाल्यानंतर भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते पालखीचे दर्शन घेतले व भाविक भक्त होते.

# 500 हून अधिक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा शनिवारी गौरव

## अर्जुन पुरस्कार विजेत्या सरिका काळे व मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार सन्मान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशनच्या वतीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ५०० हून अधिक खेळाडूंचा भव्य गौरव सोहळा शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता भानुदास चव्हाण सभागृह, रेल्वे स्टेशन रोड येथे आयोजित करण्यात आला आहे. अर्जुन पुरस्कार विजेत्या व आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडू सरिका काळे तसेच मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते खेळाडूंचा सन्मान करण्यात येणार आहे.

ॲथलेटिक्स, खो-खो, कबड्डी, कुस्ती, बॉक्सिंग, तायक्वांदो, नेमबाजी, जलतरण, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ, हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, योगासन, वेटलिफ्टिंग, सायकलिंग यांसह सुमारे ५० विविध क्रीडा प्रकारांमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यात येणार आहे.

सरिका काळे यांच्या हस्ते विशेष गौरव

भारतीय महिला खो-खो संघाच्या माजी कर्णधार आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या सरिका काळे या देशातील नामवंत खेळाडू म्हणून ओळखल्या



जातात. संघर्ष, जिद्द, मेहनत आणि नेतृत्वाच्या जोरावर त्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्यांच्या हस्ते नव्या पिढीतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा होणारा सन्मान हा सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

दिव्यांग खेळाडूंना आर्थिक पाठबळ



दिव्यांग खेळाडूंना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी विशेष आर्थिक मदत, अनुदान आणि पुरस्कार उपलब्ध करून देण्याच्या दिशेने मंत्री अतुल सावे यांच्या पुढाकाराने उपक्रमाला चालना देण्यात येणार आहे. प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, विविध स्पर्धांतील सहभाग तसेच पुढील क्रीडा वाटचालीसाठी आवश्यक आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. दिव्यांग खेळाडूंच्या प्रतिभेला केवळ सन्मान न देता त्यांना समान संधी आणि संस्थात्मक पाठबळ मिळावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

सत्कारमूर्तींनी उपस्थित राहण्याचे आवाहन

सत्कारासाठी ज्या खेळाडूंची नावे जाहीर करण्यात आली आहेत, त्या सर्वांनी शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजण्यापूर्वी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून आपली उपस्थिती नोंदवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सत्कारमूर्तींची यादी आयोजकांकडून जाहीर करण्यात आली आहे.

शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, युवा खेळाडू, प्रशिक्षक, पालक तसेच क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केलेल्या खेळाडूंचा गौरव प्रत्यक्ष पाहण्याबरोबरच त्यांच्या संघर्षातून आणि कर्तृत्वातून नव्या पिढीला प्रेरणा मिळणार आहे.

जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष पंकज भारसाखळे, उपाध्यक्ष बिजली देशमुख, उपाध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. उदय डोंगरे, सचिव ॲड. गोविंद शर्मा, सहसचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. दिनेश वंजारे, कोषाध्यक्ष विश्वास जोशी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# दोन वाहनाचा धडकेत धडकले ट्रक व टिप्पर जागेवर जळून खाक

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार



**परभणी:-** गेली अनेक काही दिवसापासून वसमत रोडवर अपघाताचे प्रमाण वाढले असून मध्यभागी कुठे स्पीड ब्रेकर नसल्यामुळे वाहन चालक सुसाट वेगाने आपली वाहने धावत असतात धावत असताना त्यावरील नियंत्रण न करता आल्यामुळे अनेक वाहनाचे समोरा सर्व जोरदार धडक बसते त्यामुळे मोठमोठे अपघात घडतात असाच एक अपघात सिमेंटने भरलेला ट्रक आणि टिप्पर यामध्ये जोरदार धडक झाल्यानंतर या या आगीत दोन्ही वाहने जळून खात झाली असून या अपघातात सुदैवाने जीवित हानी झाली नसून दोन्ही गाड्यांचे चालक गंभीर जखमी झाले आहेत सदरील घटना 26 आगस्ट बुधवार रोजी पहाटे पाचच्या सुमारास वसमत रोडवरील त्रिधारा पाटी पुलाजवळ घडली. एम एच 34 बी झेड 1897 या क्रमांकाचा ट्रक सिमेंट घेऊन परभणी कडे येत असताना त्याच वेळेस एम एच 43 यु ७६०८ या क्रमांकाचा टिप्पर राहटी कडे पुलावर दोन्ही वाहनांचा समारोसमोर फार मोठा अपघात झाला दोन्ही वाहनांनी पेट घेतला पहाटेची वेळ असल्यामुळे त्रिधारा कडे दर्शनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी वेळेत सतर्कता दाखवून दोन्ही वाहनातील चालकांना बाहेर करण्यात यश आले असून घडलेल्या घटनेची माहिती परभणी अग्निशामक देण्यात देण्यात आली असून अग्निशमन अधिकारी दीपक कानोडे वायरमेन निखिल बँडसुरे मदन जाधव वाहन चालक असीम अखिल अहमद यांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली या अपघातात दोन्ही वाहनाचे चालक रमेश कांबळे व किशोर जाधव गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी परभणीतील खाजगी रुग्णालय दाखल करण्यात आले आहे .

# राखी खरेदीला रंगत : स्टोन-कार्टूनच्या राख्यांना पसंती

**जिंतूर :** रक्षाबंधनाचा सण अवघ्या काही दिवसांवर आल्याने जिंतूर शहरातील बाजारपेठेत राखी खरेदीची लगबग वाढली आहे. बहिण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या राख्यांचे विविध आकर्षक प्रकार बाजारात दाखल झाले असून, पारंपरिक राख्यांसोबतच स्टोन, कार्टून, लाईट्स तसेच विविध डिझाईनच्या राख्यांना विशेष मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

शहरातील मुख्य बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज परिसर, अच्छा कॉम्प्लेक्स, मेन चौक येथिल विविध दुकानांमध्ये रंगीबेरंगी राख्यांचे स्टॉल



थाटण्यात आले आहेत. लहान मुलांसाठी कार्टून, भीम, छोटा भीम, मोटू-पतलू, स्पायडरमॅन आदी चित्रांसह राख्या उपलब्ध आहेत. तरुणाईमध्ये स्टोन व आकर्षक डिझाईनच्या राख्यांना पसंती मिळत आहे. महिलांकडून पारंपरिक गौरी व कलश राख्यांचीही खरेदी केली जात आहे.

***राख्यांचे दर स्थिर*** : जिंतूर बाजारपेठेत साध्या राख्यांपासून आकर्षक डिझाईनच्या राख्यांपर्यंत विविध प्रकार उपलब्ध आहेत. स्टोन राखीचे दर साधारण १० ते १०० रुपये, कार्टून राखी २० ते ९० रुपये, तर कपल राखी १०० ते ५०० रुपयांपर्यंत उपलब्ध असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. यंदा राख्यांच्या दरात मोठी वाढ झालेली नसल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

*** भा ऊ रा या सा ठी बहिणींची लगबग*** : रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर बहिणींनी आपल्या भावासाठी आवडीची राखी निवडण्यास सुरुवात केली आहे. काही बहिणी भावाच्या आवडीनुसार राखी खरेदी करत असून, काही ठिकाणी राखीसोबत भेटवस्तू व पोस्टद्वारे राखी पाठविण्याची तयारीही सुरू आहे. सण जवळ येत असल्याने पुढील काही दिवसांत राखी विक्रीला आणखी वेग येण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

***लहानग्यांना कार्टून राखीची भुरळ*** : लहान मुलांसाठी बाजारात विविध कार्टून पात्रांच्या राख्या उपलब्ध झाल्या आहेत. भीम, छोटा भीम, मोटू-पतलू, स्पायडरमॅन यांसह लाईट्स व म्युझिक असलेल्या राख्यांकडे बालकांचे विशेष आकर्षण आहे. त्यामुळे पालकांसोबत मुलांचीही राखी खरेदीसाठी बाजारात गर्दी होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी खडकणारला जिल्हा परिषद शाळेत आरओ प्लांट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** खडकणारला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने एच जी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सीएसआर प्रकल्पांतर्गत आरओ प्लांटची उभारणी करण्यात आली. या आरओ प्लांटचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळेत आरओ प्लांटची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे शुद्ध व सुरक्षित पाणी मिळणार आहे. त्यामुळे जलजन्य आजारांपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण होण्यास मदत होणार असून, त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

या उद्घाटन समारंभास संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटीचे व्यवस्थापक हरीश लालकोट, कार्यक्रम समन्वयक सचिन लिमकर, सचिन डहाळे, इर्शाद सय्यद यांच्यासह खडकणारला गावचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकवृंद यांची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी एच जी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटीच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचे आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षितता यासाठी अशा सामाजिक उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. शाळेत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेच्या प्रतिनिधींचे आभारही व्यक्त करण्यात आले.

# अखिल बुरुड समाज प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय महा मेळाव्याचे 30 ऑगस्ट रोजी माणगाव येथे आयोजन

**बोरघर, माणगाव, रायगड:** महाराष्ट्रातील बुरुड समाजाला एका छताखाली आणण्यासाठी आणि सामाजिक एकजुटीचा संदेश देण्यासाठी *अखिल बुरुड समाज प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य* या सेवाभावी सामाजिक संघटनेतर्फे *भव्य राज्यस्तरीय बुरुड समाज मेळाव्याचे* आयोजन करण्यात आले आहे.

हा महामेळावा *येत्या रविवार, दि. 30 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी ठीक 3.00 वाजता, मानस बँक्वेट हॉल, इंडियन ऑईल पेट्रोल पंपा शेजारी, मुंबई-गोवा महामार्गालगत, तिलोरे, ता. माणगाव, जि. रायगड* येथे संपन्न होणार आहे.

या दिग्गजांची राहणार प्रमुख उपस्थिती

या राज्यस्तरीय सोहळ्याला महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. - *मा. श्री. भरतशेठ गोगावले* - पालकमंत्री, रायगड - *मा. श्री. चंद्रकांतजी खैरे* - माजी खासदार व माजी मंत्री - *मा. कु. आदितीताई तटकरे* - महिला व बालविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य - *मा. श्री. किशोरभाऊ जोरगेवार* - आमदार, चंद्रपूर तथा समाज भूषण - *मा. श्री. हरीशभाऊ पिंपळे* - आमदार, अकोला यांच्यासह महाराष्ट्रभरातील बुरुड समाजातील अनेक नामवंत व प्रतिष्ठित उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# एमडी पावडरची चोरटी विक्री करणाऱ्या दोघांना अटक; 2.41 लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात अंमली पदार्थांची चोरटी विक्री करणाऱ्यांविरोधात अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कारवाई करत दोन जणांना अटक केली. त्यांच्याकडून नशेसाठी वापरले जाणारे १३ ग्रॅम ५९० मिलीग्रॅम एमडी पावडर (मेफेड्रोन), दोन मोबाईल हॅण्डसेट आणि एक दुचाकी असा एकूण २ लाख ४० हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मंगळवारी (दि. २५) द्वारकादास शामकुमारसमोरील एमजीएमकडे जाणाऱ्या रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. यावेळी शेख सादीक शेख सलीम (२७, रा. बक्कलगुडा, सादत मशीदजवळ, शहागंज) आणि अमान कुरेशी मुश्ताक कुरेशी ऊर्फ चौधरी (२५, रा. सिराज हॉटेलसमोर, जिन्सी) हे दोघे एमडी पावडरची चोरटी विक्री करताना आढळून आले.

पथकाने दोघांना ताब्यात घेत त्यांच्याकडील एमडी पावडर, दोन मोबाईल हॅण्डसेट आणि दुचाकी जप्त केली. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध सिडको पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (एनडीपीएस) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाचवे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :-**श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ स्नेह शारदा नगर वसमत रोड परभणी च्या वतीने श्रावण मासाच्या निमित्ताने पाचवे ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न ज्ञानेश्वर उपारायण सोहळा 20 ऑगस्ट 26 ऑगस्ट या दरम्यान ज्ञानेश्वरी पारायण व श्री विष्णू सहस्त्रनाम पारायण सोहळा तसेच बा. ल चोथवे महाराज यांनी काल्याचे प्रवचन केले तसेच पारायणाचे व्यासपीठ नेतृत्व श्री ह भ प दादाराव महाराज भालके, भागवताचार्य ह भ प एकनाथ महाराज पांचाळ ,विष्णुभक्त श्री ह भ प बालाजी महाराज





तुंगेनवार, तसेच ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन श्रीमती लतिका ताई मोहनराव मुळे, श्रीमती शीलाताई भागवत राव ढगे यांच्या वतीने दररोज सात दिवस सर्व महाप्रसाद चे आयोजन करण्यात आले होते ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मागील पहिले एप्रिल महिन्यापासून बालाजी तुंगेनवार, दुसरे मे महिन्याची यजमान श्रीमती वंदनाताई वाडकर मॅडम, तिसरे जून महिन्याचे यजमान नामदेवराव डाळ, सोपानराव डाळ चौथे जुलै महिन्याचे यजमान रनेर साहेब ,यशवंत नगर आणि पाचवे ऑगस्ट महिन्याचे यजमान श्रीमती लतिका ताई मुळे, श्रीमती शीलाताई ढगे आतापर्यंत यांनी श्रीफळ पुढच्या सहावे ज्ञानेश्वरी पारायण सोहळा यजमान पी.जी देशमुख साहेब हे आहेत तरी सर्व ज्ञानेश्वरी भक्त शंभर ते दीडशे ज्ञानेश्वरी पारायण आला पारायण करत आहेत हा खूप मोठा प्रतिसाद असाच कार्यक्रम अखंड चालू राहणार आहे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा पाचवे 26 ऑगस्ट 2026 रोजी संतज्ञान मंडप सभाग्रह व गजानन महाराज मंदिर व महालक्ष्मी मंदिर स्नेह शारदा नगर वसमत रोड येथे संपन्न झाला यावेळी श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ चे विष्णूभक्त ह भ प बालाजी महाराज तुंगेनवार, श्री सोपानराव डाळ, गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर,रमाकांत तमेवार , किशनराव पोपळघट, प्रभाकर सराफ ज्ञानोबा कदम, सुधाकर महाराज कुलकर्णी , पी जी देशमुख, शिंदे सर चौके सर, चौधरी, पवार ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना महिला मंडळचे ज्ञानेश्वर वाचक शीलाताई कदम, वंदनाताई वाडकर ,अनुसयाबाई चौके लतिकाताई मुळे ,शीलाताई ढगे आदी.

# प्रेमाचा आणि माणुसकीचा गोडवा! फर्दापूरमध्ये 'ईद ए मिलाद'ला उधाण दर्गा मित्र मंडळाच्या उपक्रमाने जिंकली सर्वांची मने

**फर्दापूर :** सण कोणताही असो त्याचा खरा आनंद एकमेकांमध्ये प्रेम आणि गोडवा वाटण्यातच असतो आज फर्दापूरमध्ये ईद ए मिलाद च्या पवित्र दिवशी याचाच अतिशय विलोभनीय आणि मन प्रसन्न करणारा अनुभव गावकऱ्यांनी घेतला हजरत पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या जन्मोत्सवाच्या या मंगल पर्वानिमित्त गावात जणू आनंदाचे आणि उत्साहाचे उधाण आले होते

चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील हसू हेच खरे बक्षीस





या आनंदाच्या क्षणांमध्ये अधिक गोडवा भरण्याचे अत्यंत सुंदर काम दर्गा मित्र मंडळ फर्दापूर यांच्या वतीने करण्यात आले हजरत सय्यद जलालुद्दीन बाबा दर्गा परिसरात या मंडळाने सर्वांसाठी थंडगार सरबत बिस्किटे आणि चॉकलेट्सची लयलूट केली एरवी सणांची खरी मजा लहान मुलांमध्येच असते आणि आज जेव्हा या चिमुकल्यांच्या हातात चॉकलेट्स आणि थंडगार सरबत पडले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर जे निरागस आणि गोड हसू फुलले होते ते पाहून तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाचे मन खऱ्या अर्थाने सुखावले

दिवसभर पैगंबरांच्या नावाचा पवित्र गजर

या उत्सवात केवळ जल्लोष नव्हता तर एक अथांग भक्ती आणि आत्मिक शांतता होती दिवसभर अत्यंत श्रद्धेने आणि प्रेमाने हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या पवित्र नावाचा गजर सुरू होता पैगंबरांनी दिलेला प्रेम करुणा आणि मानवतेचा संदेश आज दर्गा परिसरातील या गर्दीत खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात उतरताना दिसत होता

दर्गा मित्र मंडळाच्या गोड' उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांना एकत्र जोडणाऱ्या आणि सणाचा आनंद द्विगुणित करणाऱ्या दर्गा मित्र मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे संपूर्ण गावातून भरभरून कौतुक होत आहे एकमेकांना प्रेमाने आलिंगन देत सरबताचा गोडवा चाखत आणि शांततेचा संदेश देत फर्दापूरकरांनी यंदाची ईद ए मिलाद खऱ्या अर्थाने खास आणि कायम लक्षात राहण्याजोगी बनवली

# शासकीय दंत महाविद्यालयातर्फे 108 रुग्णांची तपासणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** उपळा कालीमठ येथे सुरू असलेल्या ५० व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने धर्म, संस्कृती आणि आरोग्यसेवेचा अनोखा संगम पाहायला मिळाला. ५० वा अखंड हरिनाम सप्ताह समिती, उपळा कालीमठ यांच्या वतीने आयोजित आरोग्य उपक्रमांतर्गत शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय आणि जेजे हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य व दंत तपासणी शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांना वारकरी, भाविक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या मोफत दंत तपासणी शिबिरात जिल्हा परिषद शाळेतील ६३ विद्यार्थी आणि ४५ नागरिक अशा एकूण १०८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना मुख आरोग्य, दातांची निगा आणि दंत आजारांपासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विविध दंत आजार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची पोस्टर्सद्वारे माहिती देत जनजागृती करण्यात आली.

शासकीय दंत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. माया इंदुरकर, सामाजिक दंतशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगदीशचंद्र वठार आणि सहयोगी प्राध्यापक डॉ. हर्षल बाफना यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापक डॉ. मेहुल शाह, डॉ. व्ही. देवराज आणि डॉ. सुरजकुमार यादव यांनी रुग्णांची तपासणी केली.

# बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या छात्र सेवाकालाचा उत्साहात शुभारंभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय अध्यापक महाविद्यालयातील बी. एड. द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचा छात्र सेवाकाल शासकीय विद्या निकेतन येथे मंगळवार, दि. १८ ऑगस्टपासून सुरू झाला. या छात्र सेवाकालाचा उद्घाटन सोहळा गुरुवारी, दि. २० ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तसेच उद्घाटक म्हणून शासकीय विद्या निकेतनच्या प्राचार्य डॉ. सुनीता राठोड उपस्थित होत्या. त्यांनी छात्र अध्यापकांना गुणवत्तापूर्ण व प्रभावी पद्धतीने शैक्षणिक कार्य करण्यासाठी मार्गदर्शन केले. अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या गरजा, शैक्षणिक गुणवत्ता आणि नावीन्यपूर्ण उपक्रम यांना महत्त्व देण्याचे आवाहन त्यांनी केले.

शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नलिनी चोंडेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांना छात्र सेवाकाल यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले. छात्र सेवाकाल मार्गदर्शक डॉ. पद्मा जाधव, शिक्षक चरपेलवार, मेंटॉर शिक्षिका माया सोनवणे तसेच छात्र अध्यापक चिन्मय कुलकर्णी यांनीही यावेळी समयोचित मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्रमुख्याध्यापक संध्या हिंगोले यांनी केले, तर छात्रउपमुख्याध्यापक अरबाज शेख यांनी आभार मानले. सूत्रसंचालन साधना जोशी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ऋषिकेश गावंडे, सूर्यकांत मुळीक, गालिब पठाण, पूजा डोईफोडे, संजना ससेमहाल, हर्षा दानकर आणि वर्षा मोरे या प्रशिक्षणार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. प्रविण सूर्यवंशी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान; वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल लोकविकास नागरी सहकारी बँकेतर्फे गौरव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. प्रविण सूर्यवंशी यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल लोकविकास नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. बँकेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जे. के. जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना देशभरात अत्याधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, वैद्यकीय सुविधा आणि प्रगत उपचारपद्धती उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. सूर्यवंशी यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचीही यावेळी विशेष दखल घेण्यात आली.

या वेळी आमदार अंबादास दानवे, बँकेचे अध्यक्ष डॉ. जे. के. जाधव, उपाध्यक्ष श्रीमंत उकीर्डे, माजी आमदार नामदेवराव पवार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सूर्यवंशी यांनी रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन तसेच सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासोबतच रुग्णांना विश्वास, सुरक्षितता आणि दर्जेदार उपचार देणारे डॉक्टर म्हणून त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ अनेक डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थी तसेच सहकाऱ्यांना मिळत असून, मार्गदर्शक म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे.

गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचार उपलब्ध करून देणे, आरोग्यविषयक जनजागृती करणे तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे, या कार्यामुळे त्यांच्या सेवेला व्यापक सामाजिक महत्त्व प्राप्त झाले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सातत्यपूर्ण सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत लोकविकास नागरी सहकारी बँकेने त्यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. या पुरस्काराबद्दल एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा यांच्यासह सर्व संबंधितांनी डॉ. प्रविण सूर्यवंशी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911